# चाणक्य मंडल परिवार

प्रश्नपुस्तिका क्रमांक CMPT002
**BOOKLET No.**

उत्तरपुस्तिका

एकूण प्रश्न : 60

वेळ : 1.30 (दीड) तास

## GS II : कायदे

एकूण गुण : 60

| Q. | A. | Q. | A. | Q. | A. | Q. | A. | Q. | A. | Q. | A. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4 | 11 | 4 | 21 | 3 | 31 | 2 | 41 | 3 | 51 | 2 |
| 2 | 1 | 12 | 3 | 22 | 3 | 32 | 4 | 42 | 2 | 52 | 2 |
| 3 | 4 | 13 | 1 | 23 | 3 | 33 | 4 | 43 | 1 | 53 | 2 |
| 4 | 1 | 14 | 3 | 24 | 4 | 34 | 4 | 44 | 4 | 54 | 4 |
| 5 | 4 | 15 | 3 | 25 | 4 | 35 | 1 | 45 | 2 | 55 | 3 |
| 6 | 3 | 16 | 2 | 26 | 3 | 36 | 3 | 46 | 3 | 56 | 3 |
| 7 | 2 | 17 | 1 | 27 | 2 | 37 | 2 | 47 | 1 | 57 | 1 |
| 8 | 3 | 18 | 3 | 28 | 1 | 38 | 2 | 48 | 3 | 58 | 2 |
| 9 | 4 | 19 | 4 | 29 | 3 | 39 | 2 | 49 | 3 | 59 | 3 |
| 10 | 3 | 20 | 2 | 30 | 3 | 40 | 2 | 50 | 1 | 60 | 2 |


चाणक्य मंडल परिवार

स्पष्टीकरण :

## GS II : कायदे

| प्रश्न | उत्तर | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| 1 | 4 | कलम 12 : दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करणे.<br>अर्ज प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी<br>↓ 3 दिवसांमध्ये<br>प्रथम सुनावणी<br>↓ 60 दिवसांमध्ये<br>अर्ज निकालात काढणे |
| 2 | 1 | कलम 18 मध्ये वरील तरतूद देण्यात आली आहे. |
| 3 | 4 | The protection of women from Domestic Violence Act, 2005 मधील कलम 2 मध्ये विविध व्याख्या दिल्या आहेत.<br>2(a) = पीडित व्यक्ती<br>2(b) = मुले<br>2(c) = नुकसान भरपाईचा आदेश - कलम 22 नुसार दिलेला आदेश<br>2(e) = कौटुंबिक प्रसंगाबाबत अहवाल<br>2(g) = प्रतिवादी |
| 4 | 1 | - हा कायदा 26 ऑक्टोबर 2006 पासून अंमलात आला आहे.<br>- संरक्षण अधिकाऱ्याची शिक्षा कलम 33 नुसार : 1 वर्ष कारावास / रु. 20,000 दंड / दोन्ही<br>- प्रकरणे 5, कलम 37 आहेत. |
| 5 | 4 | - कलम 39(a) : (भारतीय संविधान) - यामध्ये सर्व स्त्री पुरुषांना उपजिविकेच्या पुरेशा साधनांचा हक्क उपलब्ध करून दिला जातो.<br>- मानवी हक्कांचा जाहीरनामा - 10 डिसेंबर 1948 रोजी स्वीकारला गेला. यातील कलम 2 मध्ये वर्ण, वंश, लिंग भाषा, धर्म इ आधारावर कोणत्याही व्यक्तींमध्ये भेदभाव केला जाणार नाही, असे नमूद केले आहे. |
| 6 | 3 | - कलम 2(23) या उपकलमामध्ये भोगवटादार या संज्ञेचा अर्थ दिलेला आहे.<br>- कलम 29 या कलमामध्ये राज्याकडून जमीनधारणा करणाऱ्या व्यक्तींचे पुढील वर्ग दिले आहेत.<br>(अ) भोगवटादार वर्ग 1<br>(ब) भोगवटादार वर्ग 2<br>(क) शासकीय पट्टेदार |

चाणक्य मंडल परिवार

| | | |
|---|---|---|
| 7 | 2 | - गावठाण जमीन = गावठाण जमीन म्हणजे कलम 122 प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या गावच्या, नगराच्या शहराच्या जागेमध्ये समाविष्ट असलेली जमीन असा होतो. (लोकसंख्या व घरे जेथे एकत्रित होतात ती जागा.)<br>- दुमाला = या संज्ञेचा अर्थ जमीन महसूल देण्याचे राज्य शासनाचे हक्क कोणत्याही व्यक्तीच्या मालकीत हस्तांतरीत होणे असा होतो. |
| 8 | 3 | - कलम 78 अन्वये, राज्यशासनास पिके न आल्यामुळे, पुरामुळे किंवा इतर कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे कोणत्याही भागात, कोणत्याही वर्षी नियमानुसार किंवा विशेष आदेशानुसार जमीन महसूल संपूर्णतः किंवा अंशतः कमी करता येईल किंवा तहकूब करता येईल किंवा सूट देता येईल.<br>- यानुसार पिकांची आणेवारी / पैसेवारी काढली जाते व ठरवले जाते की महसूल किती वसूल करायचा आहे.<br>- यासाठी तहसिलदार ग्रामपीक पैसेवारी समिती स्थापन करतात.<br>- ग्रामपीक पैसेवारी समिती - अध्यक्ष - मंडल निरिक्षक + 2 शेतकरी प्रतिनिधी + तलाठी.<br>- ही समिती पिकांची पैसेवारी नजर (निरिक्षण) अनुमान पद्धतीनुसार काढेल.<br>- ज्या क्षेत्रात दुष्काळ, गारपीट, महापूर झाला असेल तेथील शेतीचा नैऋत्येकडील (10 मीटर x 10 मीटर) भाग यासाठी नमुना म्हणून निवडावा.<br>1R =  <br>- या नंतर सांख्यिकी विभागाकडून गेल्या 10 वर्षांपासून त्या भागाचे सरासरी उत्पन्न व पाहणीच्या वेळेचे उत्पन्न यांचा अनुपात काढून (Compare करून) जर पाहणीच्या वेळेचे उत्पन्न 50% पेक्षा कमी आले तर दुष्काळ जाहीर करावा. |
| 9 | 4 | - कृषी वर्ष - 1 एप्रिल ते 31 मार्च [2(1)]<br>- महसूली वर्ष - 1 ऑगस्ट ते 31 जुलै |
| 10 | 3 | - |

चाणक्य मंडल परिवार

| | | |
|---|---|---|
| 11 | 4 | - जमिनीच्या उपयोगाबाबत -<br>- कलम 41 - शेतीच्या कारणासाठी (प्रयोजनांसाठी) जमीन धारण करणाऱ्या व्यक्तिस कोणत्या कारणांसाठी आपल्या जमिनीचा उपयोग करता येईल.<br>- कलम 42 - जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय शेतीसाठी उपयोग करण्यात येणाऱ्या कोणत्याही अकृषक प्रयोजनासाठी उपयोग करता येणार नाही.<br>- कलम 43 - जमिनीच्या उपयोगावर निर्बंध. (शेतासाठी असलेल्या जमिनीतून मीठ काढणे, माती, दगड, कंकर, मुरूम किंवा इतर कोणताही असा माल काढून नेणे.)<br>- कलम 44 - जमिनीच्या वापराचे एका प्रयोजनातून दुसऱ्या प्रयोजनात रूपांतर करण्याकरिता कार्यपद्धती.<br>व्यक्ती<br>↓<br>जिल्हाधिकाऱ्यास अर्ज करेल<br>(7 दिवसांमध्ये पोच देईल - फेटाळला तर लेखी कारणे)<br>↓<br>परवानगी दिली<br>↓<br>अशी परवानगी मिळणारी व्यक्ती वापरातील बदलास सुरुवात झाली असेल अशा दिनांकापासून 30 दिवसांच्या आत, तो ग्रामअधिकाऱ्यामार्फत तहसिलदारास कळवेल. |
| 12 | 3 | - या अधिनियमातील कलम 8 मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य भूमी अभिलेख विभागाची रचना :<br>जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमीअभिलेख (महाराष्ट्र राज्य )<br>↓<br>उपसंचालक भूमीअभिलेख (विभागीय प्रमुख)<br>↓<br>जिल्हा अधिक्षक भूमीअभिलेख (जिल्हा स्तरावर)<br>↓<br>उपअधिक्षक भूमीअभिलेख (तालुका स्तरावर) |
| 13 | 1 | - |
| 14 | 3 | - |

चाणक्य मंडल परिवार

| | | |
|---|---|---|
| 15 | 3 | - कलम 29<br>(a) भोगवटादार वर्ग 1<br>ज्याच्या जमिनीच्या कायमच्या हस्तांतरणावर कोणताही निर्बंध नाही असा इसम वा व्यक्ती.<br>(b) भोगवटादार वर्ग 2<br>ज्याच्या जमिनीच्या कायमच्या हस्तांतरणावर निर्बंध लावले गेले आहेत (शासन अटी घालते) असा इसम वा व्यक्ती.<br>(c) शासकीय पट्टेदार<br>- वाजिब-उल-अर्ज ठरवण्याचे कार्य जिल्हाधिकारी राज्यशासनाच्या आदेशाने करतील. |
| 16 | 2 | नागरी हक्क संरक्षण अधिनियम (Protection of Civil Rights Act) 1955<br>- अस्पृश्यता (अपराध) कायदा, 1955 संमत.<br>- अस्पृश्यतेविषयी जाहीर शिकवण देणे, अस्पृश्यता पाळणे, त्यातून उद्भवणारी कोणतीही निःसमर्थता लादल्याबद्दल आणि त्याच्याशी निगडित असलेल्या बाबींबद्दल शिक्षा विहित करण्यासाठी हा कायदा करण्यात आला.<br>- या कायद्याची अंमलबजावणी सर्व भारतात 1 जून 1955 पासून सुरू झाली.<br>- या कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी आणि त्याची व्याप्ती वाढवण्यासाठी या कायद्यामध्ये 1976 साली सर्वंकष सुधारणा करण्यात आली. तसेच त्याचे नाव बदलून **नागरी हक्क संरक्षण अधिनियम, 1955** करण्यात आले. |
| 17 | 1 | नागरी हक्क संरक्षण अधिनियम 1955 :<br>- कलम 2 : व्याख्या :<br>- उपकलम (e) : दुकान :<br>जेथे घाऊक किंवा किरकोळ अथवा घाऊक व किरकोळ अशा दोन्ही प्रकारे माल विकला जातो, अशी कोणतीही वास्तू. त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो.<br>- फेरिवाला किंवा विक्रेता यांच्याकडील फिरते वाहन किंवा गाडीमधून जिथे माल विकला जातो, ते ठिकाण.<br>- धुलाई घर किंवा केशकर्तनालय.<br>- जिथे ग्राहकांना सेवा उपलब्ध करून दिली जाते असे अन्य कोणतेही स्थान. |
| 18 | 3 | नागरी हक्क संरक्षण अधिनियम 1955<br>- कलम 15 : अपराध दखलपात्र व संक्षिप्त रितीने चालवणे (अपवाद 3 महिन्यांपेक्षा जास्त शिक्षा असल्यास)<br>- प्रथम वर्ग / महानगर दंडाधिकाऱ्याकडे.<br>- लोकसेवकावर गुन्ह्यास सहाय्य केल्याचा आरोप असल्यास न्यायलय सरकारच्या पूर्वपरवानगि'शिवाय दखल घेत नाही. |
| 19 | 4 | - |
| 20 | 2 | नागरी हक्क संरक्षण अधिनियम, 1955<br>- कलम 6 : ग्राहक केवळ अस्पृश्य असल्याने वस्तू / सेवा देण्यास नाकारणे.<br>- अस्पृश्यतेच्या कारणावरून माल विकण्याचे किंवा सेवा उपलब्ध करून देण्याचे नाकारल्याबद्दल किमान 1 महिना ते कमाल 6 महिने कारावास आणि रु. 100 ते रु. 500 द्रव्य दंडाची शिक्षा होऊ शकते. |

चाणक्य मंडल परिवार

| | | |
|---|---|---|
| 21 | 3 | अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989 (SCs and STs Prevention of Atrocities Act, 1989)<br>- भारतीय संविधानाच्या कलम 17 अनुसार सर्व प्रकारच्या अस्पृश्यतेचे निर्मूलन केले असले तरीही दलित व आदिवासींच्या विरुद्ध अत्याचार, अस्पृश्यता यांसारख्या घटना घडत होत्या.<br>- त्यामुळे केंद्र सरकाने **नागरी हक्क संरक्षण अधिनियम, 1955** संमत केला.<br>- पण या कायद्याअंतर्गत दंड व शिक्षा अत्यल्प होत्या. तसेच IPC च्या संबंधित तरतूदीही परिणामकारक ठरत नव्हत्या.<br>- म्हणून संसदेने अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989 संमत केला. |
| 22 | 3 | - कलम 3 : अत्याचाराच्या अपराधांसाठी शिक्षा :<br>खालीलपैकी कोणतीही कृती SC/ST नसलेल्या व्यक्तीने SC/ST व्यक्तीच्या बाबतीत केल्यास ती व्यक्ती कमीत कमी 6 महिने ते 5 वर्षांपर्यंत वाढवता येईल एवढ्या कारावासास व द्रव्यदंडास पात्र होईल.<br>- कोणताही अखाद्य / घृणास्पद पदार्थ खाण्याची वा पिण्याची जबरदस्ती करणे.<br>- कचरा, विष्ठा किंवा अन्य कोणताही घृणास्पद पदार्थ फेकून इजा करण्याचा किंवा अपमान करण्याचा प्रयत्न करणे.<br>- अंगावरील वस्त्रे फेडून नग्नावस्थेत किंवा विद्रुप रंग लावून धिंड काढणे.<br>- अन्यायाने जमीन बळकावणे किंवा अडथळा आणणे.<br>- सक्तीचे / वेठबिगारी काम करण्यास भाग पाडणे.<br>- खोटा किंवा त्रासदायक फौजदारी किंवा अन्य खटला दाखल करणे.<br>- कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी हेतूपूर्वक अपमान करणे.<br>- एखाद्या स्त्रीवर तिची बेअब्रू करण्याच्या हेतूने हल्ला करणे किंवा बलप्रयोग करणे.<br>- जलस्रोत दुषित करणे.<br>- नेहमीच्या ठिकाणाचा वापर करण्यास किवा प्रवेश करण्यास अडथळा करणे.<br>- आपले घर, गाव सोडून जाण्याची जबरदस्ती करणे व सोडावयास लावणे. |
| 23 | 3 | अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989<br>कलम 15<br>- राज्य शासन विशेष न्यायालयात खटले चालवण्यासाठी एखाद्या सरकारी अभियोक्त्याला किंवा किमान 7 वर्षे वकिली व्यवसाय करत असलेल्या वकिलाला विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करेल. |
| 24 | 4 | अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989<br>प्रकरण 5 : कलम 16 :<br>- सामुदायिक दंड आकारण्याचा राज्य शासनास अधिकार.<br>- नागरी हक्क संरक्षण अधिनियम 1955 च्या कलम 10A च्या तरतुदीनुसार राज्य शासन सामुदायिक दंड आकारू शकते. |

| | | |
|---|---|---|
| 25 | 4 | अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989<br>कलम 17 : कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या यंत्रणेने करावयाची प्रतिबंधात्मक कार्यवाही<br>- जिल्हा दंडाधिकारी वा उपविभागीय दंडाधिकारी वा अन्य कोणताही कार्यकारी दंडाधिकारी वा पोलिस उपअधिक्षकापेक्षा (DySP) कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलिस अधिकाऱ्याला माहिती मिळाल्यावर वा त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर समाधान झाले की, प्रतिबंधात्मक उपाययोजना.<br>- वरील अधिकाऱ्याच्या अधिक्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी राहणारी वा वारंवार तेथे जाणारी आणि अनुसूचित जाती व जमातीची नसेल अशी कोणतीही व्यक्ती वा गट या कायद्यांतर्गत अपराध करण्याची शक्यता आहे वा त्या व्यक्तीने वा गटाने तशी धमकी दिली आहे आणि त्याच्या मतानुसार या प्रकरणात कार्यवाही करणे पुरेसे सकारण असेल तर तो असे क्षेत्र अत्याचारप्रवण असल्याचे घोषित करेल. |
| 26 | 3 | अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989<br>कलम 14 : विशेष न्यायालय व एकमेव विशेष न्यायालय :<br>- राज्य शासन उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशांच्या सहमतीने एका किंवा अधिक जिल्ह्यांसाठी विशेष न्यायालय स्थापन करेल अथवा विशेष न्यायालय म्हणून जिल्हा सत्र न्यायालयास निर्देशित करेल.<br>- दाखल खटले 2 महिन्यांच्या आत निकाली काढणे गरजेचे.<br>- विशेष न्यायालयाच्या निर्णय, शिक्षा याविरुद्ध उच्च न्यायालयाकडे 90 दिवसात अपील.<br>- प्रत्येक अपील त्याची नोंदणी झाल्यापासून 3 महिन्यांच्या आत निकालात काढले पाहिजे. |
| 27 | 2 | अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989<br>कलम 4 : कर्तव्यातील हयगयीबद्दल शिक्षा<br>- SC/ST नसलेल्या लोकसेवकाने या कायद्यांतर्गत नमूद केलेल्या कर्तव्यात हयगय केल्यास तो किमान 6 महिने ते जास्तीत जास्त 1 वर्षापर्यंत कारावासास पात्र असेल.<br>- लोकसेवकाने हे कर्तव्य पार पाडण्यात हयगय केल्यास विशेष न्यायालय त्याची दखल घेईल व कारवाईची शिफारस करेल. |
| 28 | 1 | राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग (National Commission for SCs)<br>1978 - अनुसुचित जाती जमातींसाठी बहुसदस्यीय आयोग. (यासाठी कोणताही संसदीय कायदा नाही, शासनाच्या ठरावाद्धारे स्थापन)<br>1992 - 65 वी घटनादुरुस्ती 1990 अन्वये राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती आयोगाची स्थापना व संवैधानिक दर्जा.<br>2004 - 89 वी घटनादुरुस्ती 2003 अन्वये या आयोगाचे विभाजन होऊन अनुसूचित जमातींसाठी स्वतंत्र आयोग.<br>कलम 338 - राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग (NCSCs) :<br>- 1 अध्यक्ष + 1 उपाध्यक्ष + 3 सदस्य<br>- नियुक्ती व राजीनामा : राष्ट्रपती<br>- दिवाणी न्यायालयाचे अधिकार. |

<table>
<tr><td>29</td><td>3</td><td>पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986<br>
<table>
<tr><th>प्रकरण</th><th>कलम</th><th>संबंधित तरतुदी</th></tr>
<tr><td>पहिले</td><td>1 व 2</td><td>शीर्षक, व्याख्या</td></tr>
<tr><td>दूसरे</td><td>3 ते 6</td><td>केंद्र शासनाचे सर्वसाधारण अधिकार</td></tr>
<tr><td>तिसरे</td><td>7 ते 17</td><td>पर्यावरणीय प्रदूषणास प्रतिबंध, नियंत्रण आणि उपाय योजना</td></tr>
<tr><td>चौथे</td><td>18 ते 26</td><td>संकीर्ण तरतुदी</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>30</td><td>3</td><td>National Green Tribunal : राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण<br>- पर्यावरण संरक्षण अधिनियमाचे कलम 5(A) तसेच NGT Act, द्वारे.<br>- विविध कायद्यांतर्गत पर्यावरणाबाबत एखादा महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित झाल्यास तो NGT च्या अधिकारक्षेत्रात येतो.<br>- कामकाज : नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार व बहुमताच्या आधारे निर्णय<br>- शिक्षा : न्यायाधिकरणाच्या आदेशांची अंमलबजावणी केली नाही तर NGT एखाद्या व्यक्तीला 3 वर्षांपर्यंतचा कारावास आणि किंवा 10 कोटी रुपयांचा द्रव्यदंड ठोठावू शकते. असा अपराध कंपन्यांनी वा कंपनीने केला असेल तर त्या कंपनीला 25 कोटी रुपयांच्या द्रव्यदंडाची शिक्षा केली जाते.</td></tr>
<tr><td>31</td><td>2</td><td>पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986<br>- कलम 15 : या कायद्यांतर्गत नियम / आदेश यांचे उल्लंघन केल्याबद्दल शिक्षा.<br>- 5 वर्षांपर्यंतचा कारावास / 1 लाख रुपयांपर्यंत दंड / दोन्ही<br>- हे उल्लंघन असेच चालू असेल तर ते चालू असेपर्यंत प्रत्येक दिवसाला रु. 5000 दंड<br>- हे उल्लंघन 1 वर्षाच्या कालावधीनंतरही चालू असेल तर 7 वर्षांपर्यंत मुदतीची कारावासाची शिक्षा.</td></tr>
<tr><td>32</td><td>4</td><td>-</td></tr>
<tr><td>33</td><td>4</td><td>भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 :<br>- अंमलबजावणी : 9 सप्टेंबर 1988 पासून.<br>- भारत तसेच भारताबाहेर सर्व भारतीय नागरिकांना लागू.<br>- 2018 मध्ये कायद्यात सुधारणा.<br>- एकूण पाच प्रकरणे आणि 31 कलमांचा समावेश</td></tr>
<tr><td>34</td><td>4</td><td>भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 :<br>- कलम 13 : लोकसेवकाचे गुन्हेगारी स्वरूपाचे गैरवर्तन<br>- लोकसेवक त्याच्याकडे सोपविण्यात आलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या मालमत्तेची अप्रामाणिकपणे अफरातफर करत असेल / स्वतःच्या उपयोगासाठी वापरत असेल / इतर कोणास अशी संमती देईल किंवा<br>- बेकायदेशीररित्या स्वतःला समृद्ध करण्याचा त्यांचा हेतू होता हे सिद्ध झाल्यास<br>- यासाठी लोकसेवकाला 4 ते 10 वर्षांपर्यंत कारावास व द्रव्य दंडाची शिक्षा असेल.</td></tr>
</table>

चाणक्य मंडल परिवार

| | | |
|---|---|---|
| 35 | 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 :<br>- कलम 17 : अन्वेषण करण्यास प्राधिकृत व्यक्ती<br>- दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेच्या बाबतीत : पोलिस निरिक्षक (PI)<br>- मुंबई, कलकत्ता, चेन्नई, अहमदाबाद तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 8 मध्ये नमूद इतर कोणत्याही महानगर क्षेत्रात या संदर्भात सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP)<br>- इतर ठिकाणी पोलीस उप-अधीक्षक (DySP) किंवा समान दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेला अधिकारी. |
| 36 | 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 :<br>- कलम 31 : विशिष्ट कलमांना वगळणे<br>याद्वारे भारतीय दंड संहितेतील (Indian Penal Code), 1860 मधील कलम 161 ते कलम 165-अ वगळण्यात आले.<br>- तसेच सर्वसाधारण परिभाषा अधिनियम 1897 मधील कलम 6 रद्द झाल्याचे घोषित करण्यात आले |
| 37 | 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 :<br>कलम 2(c) : लोकसेवक<br>- शासनाच्या सेवेतील किंवा शासनाकडून वेतन घेणारे कोणतीही व्यक्ती<br>- स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील किंवा त्याच्याकडून वेतन घेणारी कोणतीही व्यक्ती<br>- न्यायदानासंबंधातील कोणतेही कर्तव्य बजावण्यासाठी न्यायालयाद्वारे प्राधिकृत व्यक्ती<br>- लवाद मंडळाचे सदस्य<br>- सहकारी सोसायटीचे पदाधिकारी (सदस्य नव्हे)<br>- विद्यापीठातील कुलगुरू प्राध्यापक तसेच त्यांना सहाय्य करणारे<br>- सरकारतर्फे अनुदान मिळणाऱ्या संस्थेतील कर्मचारी |
| 38 | 2 | - निर्वाह खर्चासाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर निर्वाह न्यायाधिकरण मुलांना अथवा नातेवाईकांना तशी नोटीस बजावेल व त्या दिवसापासनू 90 दिवसांच्या आत अर्ज निकालात काढेल.<br>अर्ज<br>↓<br>अर्जाबाबत नोटीस<br>↓<br>बाजू मांडण्याची संधी<br>↓<br>निकाल (90 दिवसात, अपवाद : 30 दिवस वाढ) |

चाणक्य मंडल परिवार

| | | |
|---|---|---|
| 39 | 2 | मातापिता आणि ज्येष्ठ नागरिकांचे देखभाल व कल्याण अधिनियम 2007 :<br>- कलम 4 : माता-पिता व जेष्ठ नागरिक यांचा निर्वाह खर्च<br>- कलम 5 : निर्वाह खर्चासाठी अर्ज<br>- स्वतःच्या कमाईमधून किंवा आपल्या मालकीच्या मालमत्तेमध्ये स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असलेले ज्येष्ठ नागरिक तसेच माता पिता कलम 5 अन्वये अर्ज करू शकतात.<br>- अर्ज करण्यास ते स्वतः असमर्थ असतील तर इतर व्यक्ती किंवा संघटना त्यांच्यावतीने अर्ज करू शकतात.<br>- तसेच न्यायाधीकरण स्वतःहून दखल घेऊ शकते. |
| 40 | 2 | मातापिता व ज्येष्ठ नागरिक याचां निर्वाह व कल्याण अधिनियम 2007 :<br>- कलम 24 : ज्येष्ठ नागरिकास उघड्यावर टाकणे व त्यांचा परित्याग करणे याबाबत शिक्षा.<br>- ज्या व्यक्ती, नातेवाईक, मुले यांच्यावर ज्येष्ठ नागरिकांच्या पालनपोषणाची जबाबदारी आहे अशा व्यक्तींनी वरील कृती केल्यास 3 महिन्यांपर्यंतचा तुरुंगवास किंवा रु. 5000 पर्यंतचा दंड किंवा दोन्ही शिक्षांची तरतूद आहे. |
| 41 | 3 | CrPC, 1973 चे कलम 125 : पत्नी, अपत्ये आई-वडील यांच्या निर्वाहाकरिता आदेश (Maintenance)<br>- पुरेशी ऐपत असताना कोणत्याही व्यक्तीने<br>- स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या खालीलपैकी कोणत्याही नातलगाची निर्वाह करण्याबाबत उपेक्षा केल्यास किंवा निर्वाह करण्यास नकार दिल्यास<br>- प्रथम वर्ग दंडाधिकारी त्यांच्या निर्वाहाकरिता योग्य वाटेल तो मासिक भत्ता देण्यासाठी निर्देशित करतील.<br>- समाविष्ट व्यक्ती : पत्नी, अज्ञान अपत्य, सज्ञान मात्र शारीरिक / मानसिक विकलांग असलेले अपत्य, आई-वडील. |
| 42 | 2 | - संबंधित कायद्याच्या कलम 7 नुसार हा कायदा अस्तित्वात आल्यापासून 6 महिन्यांच्या आत राज्य शासन जिल्ह्याच्या प्रत्येक उपविभागात एक किंवा त्यापेक्षा जास्त निर्वाह न्यायाधिकरणे स्थापन करेल. |
| 43 | 1 | बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 :<br>- संपूर्ण भारतात लागू.<br>- अंमलबजावणी : 1 एप्रिल 2010 पासून.<br>- जम्मू काश्मिरने या कायद्यानुसार नुकतेच नवीन नियम तयार केले आहेत.<br>- धार्मिक शिक्षण देणाऱ्या मदरशांना, वैदिक पाठशाळा व शैक्षणिक संस्थांना लागू होणार नाही. |

चाणक्य मंडल परिवार

| | | |
|---|---|---|
| 44 | 4 | कलम 21 : शाळा व्यवस्थापन समिती :<br>- विनाअनुदानित शाळा सोडून सर्व शाळांमध्ये एक समिती.<br>- या समितीत 12 ते 16 सदस्यांचा समावेश.<br>- किमान 3/4 सदस्य विद्यार्थ्यांचे माता-पिता अथवा पालक.<br>- समितीतील 50% सदस्य महिला<br>- तसेच शिक्षक, शिक्षण तज्ज्ञ / बालविकास तज्ज्ञांचा समावेश.<br>- अध्यक्ष व उपाध्यक्ष समितीमधून निवडले जातील.<br>- मुख्याध्यापक : पदसिद्ध सचिव |
| 45 | 2 | - |
| 46 | 3 | - प्रकरण 3 : संबंधित शासन, स्थानिक प्राधिकरण आणि मातापित्यांचे कर्तव्य : कलम 6 ते 11<br>- संबंधित कायदा लागू झाल्यापासून तीन वर्षांच्या आत नजिकच्या क्षेत्रात संबंधित शासन आणि स्थानिक प्राधिकरण यांचे शाळा स्थापन करण्याचे कर्तव्य. |
| 47 | 1 | उन्नीकृष्णन, जे.पी. आणि इतर विरुद्ध आंध्र प्रदेश सरकार खटला 1993 :<br>- सर्वोच्च न्यायालयाने या खटल्यामध्ये 14 वर्षाखालील प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असायला हवे असा निकाल दिला. तसेच या तरतुदीला सरकारने मुलभूत अधिकारांमध्ये समाविष्ट करावे असे निर्देश दिले.<br>-86 वी घटनादुरुस्ती 2002 अन्वये कलम 21 नव्याने समावेश करून 6 ते 14 वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा मूलभूत अधिकार प्रदान करण्यात आला. |
| 48 | 3 | - |
| 49 | 3 | माहिती तंत्रज्ञान अधिनियम (Information Technology Act), 2000 :<br>- उद्देश : इलेक्ट्रॉनिक कॉमर्सला कायदेशीर मान्यता देणे. तसेच शासकीय सेवांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी इलेक्ट्रॉनिक रेकॉर्डचा आधार घेणे.<br>- कलम 1 : संक्षिप्त शीर्षक, विस्तार.<br>- संपूर्ण भारताला लागू.<br>- भारताबाहेर केलेल्या भारतीय व्यक्तीच्या गुन्ह्यास लागू.<br>- अंमलबजावणी : 17 ऑक्टोबर 2000 |
| 50 | 1 | - |
| 51 | 2 | माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 :<br>- प्रकरण (ii) : कलम 65 ते 78<br>- कलम 66 (B) - चोरीचे संगणक स्त्रोत किंवा संदेशवहन साधने अप्रामाणिकपणे प्राप्त करणे<br>- तीन वर्षांपर्यंत कारावास किंवा एक लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही<br>- कलम 66 (C) : आयडेंटी थेफ्ट किंवा ओळख चोरी<br>- तीन वर्षांपर्यंत कारावास आणि एक लाख रुपयांपर्यंत दंड<br>- कलम 66 (D) : तोतयागिरी (Personation) करून फसवणूक<br>- तीन वर्षांपर्यंत कारावास आणि एक लाख रुपयांपर्यंत दंड<br>- कलम 66 (F) : सायबर दहशतवाद<br>- आजीवन कारावास |

चाणक्य मंडल परिवार

| | | |
|---|---|---|
| 52 | 2 | माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 :<br>- कलम 78 : गुन्ह्यांची चौकशी / अन्वेषण करण्याचा अधिकार.<br>- या कायद्याखाली घडलेल्या कोणत्याही गुन्ह्याचे अन्वेषण करण्याचा अधिकार पोलिस निरीक्षकापेक्षा (PI) कमी दर्जाच्या नसलेल्या अधिकाऱ्यास असेल. |
| 53 | 2 | IT Act 2000<br>प्रकरण-10 : सायबर अपीलीय अधिकरण कलम 48 ते 64.<br>- स्थापना : केंद्र सरकारकडून अधिसूचनेद्वारे.<br>- अध्यक्ष व सदस्यांची निवड : सरन्यायाधीशांच्या सल्ल्याने केंद्र सरकार.<br>- कार्यकाल : 5 / 65 वर्षे (जे आधी होईल ते)<br>- राजीनामा व सेवाशर्ती (Terms of Service) : केंद्र सरकार.<br>- नियंत्रण व निर्णय अधिकाऱ्याच्या आदेशाविरोधात 45 दिवसांच्या आत या न्यायाधिकरणाकडे अपील.<br>- न्यायाधिकरणाच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयाकडे 60 दिवसांच्या आत अपील करता येते. |
| 54 | 4 | माहितीचा अधिकार अधिनियम : 2005 : RTI Act<br>- राष्ट्रपतींची मंजुरी : 15 जून 2005.<br>- अंमलबजावणी : 12 ऑक्टोबर 2005.<br>- संपूर्ण भारतात लागू.<br>- उद्देश्य : नागरिकांचा राज्यकारभारात सहभाग वाढवणे, राज्य कारभारात पारदर्शकता आणणे.<br>- भारतीय राज्यघटनेतील कलम (19)(1) मधील भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्यामध्येच माहितीचा अधिकार अंतर्भूत असल्याचे सर्वोच्च व उच्च न्यायालयांनी विविध खटल्यांत सांगितले आहे. |
| 55 | 3 | - |
| 56 | 3 | माहितीचा अधिकार अधिनियम 2005<br>- कलम 7 : विनंतीचा अर्ज निकालात काढणे.<br>- कलम 5(2) किंवा 6(3) यांना अधीन राहून केंद्र किंवा राज्य जन माहिती अधिकारी कलम 6 नुसार माहिती मिळण्याचा अर्ज केल्यावर शक्य तितक्या लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत 30 दिवसांच्या आत, एक तर विहित केलेली फी भरल्यावर माहिती देईल.<br>- परंतु, मागितलेली माहिती जर एखाद्या व्यक्तिच्या जीवित वा स्वातंत्र्याशी संबंधित असेल तर विनंतीचा अर्ज मिळाल्यापासून 48 तासांच्या आत ती माहिती देण्यात येईल. |
| 57 | 1 | - |
| 58 | 2 | - |

चाणक्य मंडल परिवार

| | | |
|---|---|---|
| 59 | 3 | माहितीचा अधिकार कायदा (RTI Act) 2005 :<br>- कलम 12 : केंद्रीय माहिति आयोग गठीत करणे.<br>- केंद्रसरकार राजपत्रातील अधिसूचनेद्वारे स्थापन करेल.<br>- केंद्रीय माहिती आयोगात समाविष्ट व्यक्ती :<br>मुख्य माहिती आयुक्त आणि 10 पेक्षा अधिक नसतील इतके इतर केंद्रीय माहिती आयुक्त.<br>- मुख्य माहिती आयुक्तांची आणि अन्य माहिती आयुक्तांची नियुक्ती राष्ट्रपती करतील. त्यांना शिफारस करणाऱ्या समितीत पुढील व्यक्तींचा समावेश असेल.<br>- पंतप्रधान (अध्यक्ष)<br>- लोकसभेतील विरोधी पक्ष नेता<br>- पंतप्रधान निर्देशित एक केंद्रीय कॅबिनेट मंत्री<br>- मुख्यालय : दिल्ली<br>- आयोग स्वायत्त असेल. |
| 60 | 2 | माहितीचा अधिकार अधिनियम 2005<br>- कलम 20 : शिक्षा<br>केंद्रीय / राज्य जन माहिती अधिकारी केंद्रीय माहिती आयोगाला पुढील कारणांसाठी दोषी आढळल्यास प्रति दिवस रु. 250 इतका दंड आकारण्यात येईल. ही रक्कम रु. 25,000 पेक्षा जास्त असणार नाही.<br>- वाजवी कारणाशिवाय अर्ज नाकारणे.<br>- वेळेत माहिती सादर न करणे.<br>- मागितलेली माहिती नष्ट करणे.<br>- जाणीवपूर्वक चुकीची, अपूर्ण, दिशाभूल करणारी माहिती देणे. |

चाणक्य मंडल परिवार